आधुनिकीकरणाचा कैकाडी समाजातील महिलांच्या आर्थिक स्थितीवर झालेला परिणाम एक अभ्यास : विशेष संदर्भ लातूर जिल्हा

संशोधन आराखडा (Synopsis)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

आंतरविद्याशाखीय समाजकार्य विषयातील पीएच्. डी. पदवीसाठी
सादर करावयाचा संशोधन आराखडा

: संशोधक :

नागेश बबन जाधव

एम. एस. डब्ल्यू, सेट

मो. 9503388667

nagesh3388@gmail.com

: मार्गदर्शक :

डॉ. ए. एन. कर्डीले

जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय
व संशोधन केंद्र, नांदेड.

मो. 9421533959

: संशोधन केंद्र :

जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र, नांदेड.

आधुनिकीकरणाचा कैकाडी समाजातील महिलांच्या आर्थिक स्थितीवर झालेला परिणाम एक अभ्यास : विशेष संदर्भ लातूर जिल्हा

प्रस्तावनाः (Introduction)

आधुनिकीकरण ही एकाकी घडणारी प्रक्रिया नसून त्यामागे उत्क्रांतीचा फार मोठा इतिहास दडलेला आहे. औद्योगिक क्रांतीपुर्वी युरोपमध्ये झालेली वैज्ञानिक क्रांती या वैज्ञानिक क्रांतीतून उदयास आलेली औद्योगिक क्रांती. दरम्यानच्या काळातच नागरीकरणाने वेग घेतला. खेडी नगरे बनली व नगरे महानगरे बनली. त्याच बरोबर पाश्चिमात्य विचारसरणीचा प्रभाव भारतीय समाजावर पडला. विज्ञाननिष्ठा वाढली, स्वातंत्र्य, समता, बंधुभाव या नवमूल्यांचे अविसरण व त्यातूनच सांस्कृतिकरण व पाश्चिमात्यकरण या प्रक्रियांनी वेग घेतला. त्याच बरोबर नव विचाराचे वारे साऱ्या जगभर वाहू लागले. परिणामी आधुनिकीकरणानेही वेग घेतला व संपूर्ण जगाचा चेहरा मोहरा बदलला. याला भारतीय समाजही अपवाद नाही. (डोईफोडे ज्योतीप्रकाश 'भारतीय समाज संरचना व परिवर्तन', पृ.६६)

आधुनिकीकरणाची प्रक्रिया ही सार्वत्रिक व व्यापक स्वरूपाची आहे. आधुनिकीकरणाने संपूर्ण जग व्यापले आहे. भारतीय समाजही याला अपवाद नाही. पाच हजार वर्षापुर्वीचा इतिहास व प्राचीन परंपरा लाभलेल्या भारतीय समाजला जगात स्वतःचे असे आगळे वेगळे स्थान आहे. आर्य, मोगल, डच, पोर्तुगीज, इंग्रज यासारख्या परकीय आक्रमणांनी भारतीय संस्कृतिच्या विविधतेस अधिक विकसित केले. असा हा भारतीय समाज विविधतेने नटलेला आहे. यात वेगवेगळया जाती, धर्म, पंथ, संप्रदाय भाषेचे लोक राहतात. या विविधतेतही एकता आढळून येते. भारतात जेंव्हा आधुनिकतेने प्रवेश केला तेंव्हा येथील परंपरांनी आधुनिकतेचे एक वेगळे रूप धारण केले. अमेरिका व युरोपमध्ये वैज्ञानिक क्रांतीनंतर आधुनिकीकरणाचा उदय झाला असला तरी भारतात मात्र ब्रिटीशांच्या आगमनानंतरच आधुनिकीकरणाचे वारे वाहू लागले. (आगलावे प्रदीप, 'समाजशास्त्र', पृ.२४२-२४३)

प्रामुख्याने ग्रामीण भागात वास्तव्यास असणारा व शेतकऱ्यांना धान्य साठविण्यासाठी शिंदीच्या फोकाच्या कणगी, टोपल्या, कोंबडे व शेळयांची पिल्ले डालण्यासाठी झाप, टोपली, तऱ्हाणी तयार करण्याचा व्यवसाय करणाऱ्या लोकांच्या समूहास कैकाडी समाज असे म्हणतात. टोपल्याच्या किंवा कणगीच्या मोबदल्यात ग्रामीण भागातील शेतकरी वर्षाकाठी सुगीच्या हंगामात त्यांना धान्य देतात. ते इतर बलुतेदाराप्रमाणेच दिले जाते. अलिकडच्या काळात पैसे देवून या वस्तू खरेदी केल्या जात आहेत. ग्रामीण भागात गावगाड्याच्या आश्रयाने उपजिवीका करणारा कैकाडी त्याच्या व्यवसायासाठी गाढवांचा वापर करतो तर जोडधंदा म्हणून डुकरे पाळतो. त्याची मोठ्या प्रमाणात पैदास करतो. गाढव, डुक्कर आणि कुत्रे हे कैकाड्याचं धन म्हणून ओळखले जाते. गाढव व डुकरांच्या संख्येवरून त्याची श्रीमंती मोजली जाते. कैकाडी समाज हा मुळचा महाराष्ट्रीयन नाही. तेलंगणा हे या समाजाचे मुळ आहे असे सांगितले जाते. यांची मातृभाषा ही कैकाडी आहे. जी तामीळ आणि कानडी भाषेतील शब्द एकत्रीत करून तयार झाली आहे तिला कैकाडी भाषा असे म्हणतात. या कैकाडी जातीतही पाच पोटजाती आहेत.

१) कोंची कोरवा (माकडवाले)

२) धोंतले

३) कोरवा

४) पामलेर

५) टाक्के

(चव्हाण रामनाथ नामदेव, भटक्या विमुक्तांची जात पंचायत, पृ.४९-५०)

समस्या सूत्रण (Research Problem):

पिढ्यान्‌पिढ्या ज्यांच्या वाटेला केवळ उपेक्षाच आली आहे. वेशीच्या आत किंवा वेशीच्या बाहेर ज्यांना स्थान मिळालं नाही. उपरेपणाची वागणूक व दुर्लक्षित अस्थिर जीवन जगणे हे ज्यांच्या वाटेला आले आहे. आजही ज्यांच्याकडे गुन्हेगार जमाती म्हणूनच पाहिलं जातं या प्रमुख कारणामुळेच ज्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहापासून कोसोदूर ठेवण्यात आलं आहे.

ज्याचं अस्तित्व मान्य करायचच नाही असा समजच ज्या समाजाविषयी उदयास आला आहे तो समाज म्हणजे अविरतपणे भटकंती करणारा इथला भटका विमुक्त समाज होय.

(कै. जाधव आसाराम, कैकाडी समाज शब्दकोश व रीतीरिवाज, पृ.९)

महाराष्ट्रात एकूण ४२ भटक्या-विमुक्त जमाती आहेत पैकी २८ या भटक्या जमाती व १४ विमुक्त जमाती आहेत. या ४२ जाती-जमातींची पोटजातींची संख्या सुमारे २०० इतकी आहे. आपल्या देशाने १९९० नंतर खऱ्या अर्थाने जागतिकीकरणाचा स्वीकार केला. त्यामुळे संपूर्ण जगाला आपण आपल्या जवळ केले असले तरी आपल्याच देशातील आपल्या असणाऱ्या अनेक समाजबांधवांना आपल्यापासून हजारो मैल दूर केले आहे. जागतिकीकरणाच्या नीतिचा अवलंब केल्यामुळे बाहेरच्या देशातील उद्योजक, व्यापारी आपल्या देशात येऊन व्यापार करू लागले. व्यापाराच्या माध्यमातून प्रचंड आर्थिक उलाढाल करून ते स्वयंविकासाबरोबरच त्यांच्या देशाचाही विकास करू लागले. पण या नीतिमुळे स्पर्धेच्या व यांत्रिकीकरणाच्या युगातून दूर फेकले गेले ते इथले परंपरागत व्यवसाय करणारे बारा बलुतेदार व अठरा अलुतेदार त्यांच्याबरोबर भटका-विमुक्त समाज. आज परंपरागत व्यवसाय बंद पडत असल्याने या समाजातील लोकांसमोर उदरनिर्वाह भागविण्याबरोबरच अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्याचा सामना कैकाडी समाज करतो आहे. परंपरागत व्यवसाय आणि कैकाडी समाजाचा आर्थिक व सामाजिक विकास हे समिकरणच जणू नाहीसे होण्याच्या मार्गावर आहे. जर का आपण कैकाडी समाजाची आजची स्थिती व विकास याचा विचार केला तर त्यात परंपरागत व्यवसायाला अनन्य साधारण महत्त्व असल्याचे दिसून येते.

(माने लक्ष्मण, 'विमुक्तायन-महाराष्ट्रातील विमुक्त जमाती एक चिकित्स अभ्यास', पृ.४१)

संशोधन विषयाचे उद्देश (Objectives of Research):

१) आधुनिकीकरणाची संकल्पना, स्वरूप व व्याप्ती अभ्यासणे.

२) आधुनिक काळातील कैकाडी समाजातील महिलांची आर्थिक स्थिती अभ्यासणे.

३) कैकाडी समाजाचे परंपरागत व्यवसाय, प्रथा, चालीरिती, रूढी या विषयीचा अभ्यास करणे

४) आधुनिकीकरणामुळे कैकाडी समाजातील पारंपरिक व्यवसाय बंद पडत असल्यामुळे समाजातील महिलांच्या आर्थिक स्थितीवर झालेला परिणाम अभ्यासणे.

संशोधनाची गृहितके (Hypothesis of the Research) :

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती लक्षात घेता हे संशोधन करताना पुढील गृहितकांची मांडणी करण्यात आलेली आहे.

१) कैकाडी समाजातील महिलांची आर्थिक स्थिती खालावलेली आहे.

२) कैकाडी समाजातील महिला पारंपरिक व्यवसाय करतात.

३) आधुनिकीकरणाचा कैकाडी समाजातील महिलांच्या आर्थिक स्थितीवर परिणाम झाला आहे.

अध्ययन क्षेत्र (Scope of the Research) :

प्रस्तुत संशोधन कार्य लातूर जिल्ह्यातील १० तालुक्यामधील कैकाडी समाजातील महिलांच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेऊन आर्थिक स्थितीवर होणारा परिणाम अभ्यासण्यात येणार असल्यामुळे संशोधनाचा कालावधी मर्यादित आहे. आधुनिकीकरण आणि पारंपरिक व्यवसाय बंद पडत असल्यामुळे कैकाडी समाजातील महिलांच्या आर्थिक स्थितीवर होणाऱ्या परिणामांचा प्रस्तुत संशोधनात आढावा घेण्यात येणार आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व (Importance of the Research):

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ज्या-ज्या राष्ट्रभक्तांनी स्वातंत्र्य चळवळीत आपला सक्रिय सहभाग नोंदविला त्यात भटक्या-विमुक्त समाजबांधवही मागे नव्हते. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली तरीसुद्धा आजही भटका-विमुक्त समाज किंबहुना इथला कैकाडी समाज आपल्या मूलभूत गरजापासून वंचित आहे तो इथल्या राज्यकर्त्यांना, प्रशासनाला टाहो फोडून विचारतोय की, स्वातंत्र्याचं झाल काय? आमच्या पर्यंत आलच नाय.

पिढ्यान्-पिढ्या पासून चालत आलेला आपला परंपरागत व्यवसाय करून आपली उपजिविका भागविणाऱ्या कैकाडी समाजासमोर आज असंख्य प्रश्न निर्माण झाले आहेत. त्याचे प्रमुख कारण म्हणजे आधुनिकीकरण आणि आधुनिकीकरणामुळे कैकाडी समाजाच्या परंपरागत व्यवसाय संपुष्टात येऊ लागला आहे. परिणामी आज कैकाडी समाजाचा पंरपरागत व्यवसाय

ऱ्हास होत चालल्याचे आपल्याला दिसून येत आहे. परंपरागत व्यवसायामुळे कैकाडी समाजाच्या विकासात काय भर पडली व तो व्यवसाय बंद पडत चालल्यामुळे कैकाडी समाजातील महिलांच्या आर्थिक स्थितीवर काय परिणाम झाले आहेत याचा प्रामुख्याने शोध घेणे गरजेचे असल्याने प्रस्तुत विषयावर संशोधन होणे महत्वाचे आहे असे संशोधकास वाटते.

संशोधन आराखडा :

संशोधनाची उद्दिष्ट प्राप्त करणे व संशोधनाला सुयोग्य दिशा देण्यासाठी संशोधन आराखडा केला जातो. संशोधन विषयाचा विचारपूर्वक अंदाज घेऊन आराखड्याचे स्वरूप निश्चित करावे लागते. त्यामुळे संशोधनात आराखड्याला विशेष महत्त्व आहे. प्रस्तुत संशोधनाचा विषय आधुनिकीकरणाचा कैकाडी समाजातील महिलांच्या आर्थिक स्थितीवर झालेला परिणाम एक अभ्यास विशेष संदर्भ लातूर जिल्हा हा असल्याने प्रस्तुत अध्ययनात विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन आराखडा या पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. त्या आधारे संशोधनाची दिशा ठरवून तथ्य संकलनासाठी अध्ययन केले जाऊन त्या आधारे मिळवलेल्या माहितीचे वर्गीकरण करून निष्कर्ष काढले जातील.

समाजकार्य संशोधन पध्दती (Social Work Research Method) :

प्रस्तुत विषयाचे संशोधन करीत असताना गुणात्मक आणि संख्यात्मक समिश्र संशोधन करण्यात येणार आहे. त्यासाठी प्राथमिक व दुय्यम स्वरूपाच्या साधनांचा अवलंब केला जाणार आहे.

अ) तथ्य संकलन (Collection of Data) :

तथ्य संकलन ही संशोधन पध्दतीची महत्त्वाची अट आहे. कारण त्या तथ्यांच्या आधारावर निष्कर्ष मांडले जातात. हे तथ्य संकलन प्राथमिक आणि द्वितीय स्त्रोताच्या आधारे केले जाते.

१) प्राथमिक स्त्रोत :

लातूर जिल्ह्यातील १० तालुक्यातील कैकाडी समाजातील महिलांच्या मुलाखती, प्रश्नावली, भेटी या माध्यमातून प्राथमिक साधने मिळविली जाणार आहेत.

२) द्वितीय स्त्रोत :

द्वितीय स्त्रोतामध्ये विषयाशी निगडित वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, शोधप्रबंध, शोधनिबंध, संदर्भग्रंथ, तसेच पूर्व संशोधित साहित्याचा वापर करण्यात येणार आहे.

ब) विश्लेषण पध्दती :

संशोधनासाठी संशोधक जी तथ्ये संकलित करतो ती, पुर्वग्रह किंवा अस्पष्ट विस्तृत व अवास्तव स्वरूपाची असतात. अशा विखुरलेल्या तथ्यांच्या आधारे विश्लेषण करणे कठिण असते. तथ्यांचे विश्लेषण सुलभतेने होण्यासाठी व समजण्यासाठी तथ्यांचे गट पाडणे किंवा श्रेणीकरण करणे. तथ्यांचे विश्लेषण सुलभ व्हावे यासाठी समान व असमान बाबी कोणत्या आहेत हे निश्चित करून, निश्चित प्रकार निवडावे लागतात. त्यामुळे विखुरलेले तथ्य एका निश्चित स्वरूपाच्या वर्गात किंवा श्रेणीत प्रस्तुत होऊ लागतात. म्हणून प्रस्तुत संशोधनात तथ्यांच्या वर्गिकरणाचा योग्य प्रकारे उपयोग केला जाईल.

नमुना निवड :

संशोधन नमुना जर प्रतिनिधिक व योग्य असेल तर निष्कर्ष देखील सुयोग्य राहतात. म्हणून संशोधनाच्या सार्थकतेकरिता प्रतिनिधिक नमुन्याची आवश्यकता असते. प्रस्तुत संशोधन विषयांमध्ये गैरसंभाव्यता नमुना निवड पद्धतीचा वापर करून तथ्य संकलन केले जाईल. त्यासाठी लातूर जिल्ह्यातीलल १० तालुक्यामधील कैकाडी समाजातील एकूण लोकसंख्येच्या ३% ते ५% उत्तरदात्यांची नमुना निवड करण्यात येईल.

पूर्वसंशोधन साहित्याचा आढावा (Review of Research Literature) :

प्रस्तुत विषयाच्या संशोधनापूर्वी अन्य संशोधकांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या अनेक पैलुसंदर्भात संशोधन कार्य केलेले आहे. त्या संशोधकांचे, लेखकांचे काही संदर्भ ग्रंथ उपलब्ध आहेत. तसेच अन्य लेखकांनी लिहिलेल्या अनुवादीत आणि संपादित केलेल्या पूर्वसंशोधनाचा आढावा येथे घेण्यात आलेला आहे.

१) माने लक्ष्मण यांनी विमुक्तायन - महाराष्ट्रातील विमुक्त जमाती एक चिकित्सक अभ्यास या विषयावर संशोधनपर कार्य केलेले आहे. उपरोक्त संशोधनामध्ये कैकाडी समाजाचे सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

२) श्री. चव्हाण रामनाथ नामदेव यांनी भटक्या विमुक्तांची जात पंचायत या संदर्भग्रंथात भटक्या विमुक्तातील ४२ जमातींच्या प्रथा, परंपरा, चालीरिती याविषयी सखोल व अभ्यासपूर्ण मांडणी केलेली आहे.

सदरील संशोधनात आधुनिकीकरणाचा कैकाडी समाजातील महिलांच्या आर्थिक स्थितीवर झालेला परिणाम यावर प्रकाश टाकण्यात आलेला नसल्यामुळे प्रस्तुत विषयाच्या संशोधनात वेगळेपणा असलेला आढळून येतो.

संशोधन प्रकरण योजना (Chapter Scheme of Research) :

या प्रबंधामध्ये मांडण्यात आलेल्या प्रकरणाची रूपरेषा पुढील प्रमाणे आहे.

प्रकरण पहिले - प्रस्तावना
प्रकरण दुसरे - संशोधन साहित्याचा आढावा
प्रकरण तिसरे - समाजकार्य संशोधन पद्धती
प्रकरण चौथे - तथ्य विश्लेषण व निर्वाचन
प्रकरण पाचवे - निष्कर्ष, सारांश, गृहितकृत्याची पडताळणी समाजकार्य प्रारूप व शिफारशी
परिशिष्टे - मुलाखत, अनुसूची
संदर्भग्रंथ सूची

संदर्भ ग्रंथसूची (Bibliography) :

अ.क्र.	लेखक	पुस्तकाचे नाव व प्रकाशन
१.	प्रा. चव्हाण रामनाथ	भटक्या विमुक्तांचे अंतरंग ४ थी आवृत्ती २०१४, प्रकाशक-अनिल कुलकर्णी आशय प्रकाशन, बालाजी नगर, धनकवडी,पुणे-४३
२.	कै. जाधव आसाराम(गुरूजी)	कैकाडी समाज शब्दकोष व रितीरिवाज प्रथम आवृत्ती जाने. २०१३ प्रकाशक- ॲड. शिरिषकुमार आ. जाधव सलोनी प्रकाशन, राजतुळस, कैकाडीवाडा, शिवाजी हायस्कूल रोड, औरंगाबाद-४३१००१
३.	गायकवाड लक्ष्मण	आमच्याही पालात येवू द्या स्वातंत्र्याचा प्रकाश दि. ३१ ऑग.२०१३ रोजी दैनिक सकाळमधील लेख
४.	गिऱ्हे के. ओ.	भटक्याचे भावविश्व-मासिक अंक १२वा ऑग-सप्टें २०१७ प्रकाशक- कचरू ओमकारराव गिऱ्हे, गुरूगणेश नगर, न्यू पहाडसिंगपुरा, औरंगाबाद.
५.	चव्हाण रामनाथ नामदेव	भटक्या-विमुक्तांची जात पंचायत, प्रथम आ. ५ मार्च २००२ प्रकाशक-डॉ. रामचंद्र दत्तात्र्य तुळपुळे देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा. लि., ४७३, सदाशिव पेठ, पुणे-४११०३०
६.	डॉ. बोधनकर सुधीर	सामाजिक संशोधन पद्धती द्वितीय आवृत्ती-१९९९ प्रकाशक-ललिता पुराणिक

		श्री. साईनाथ प्रकाशन, भगवाघर कॉम्पलेक्स, धरमपेठ, नागपूर-१०
७.	माने लक्ष्मण	विमुक्तायन - महाराष्ट्रातील विमुक्त जमाती-एक चिकित्सक अभ्यास. प्रकाशक संस्था- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई १२ मार्च १९९७

संशोधक

नागेश बबन जाधव

मार्गदर्शक

डॉ. ए. एन. कर्डीले
जवाहरलाल नेहरू समाजकार्य
महाविद्यालय व संशोधन केंद्र, नांदेड.